**नि.दि.दा.क्र. ४०९/२०१६**
**नि.क्र.७३**

**<u>उलट तपास वादीकरिता विधीज्ञ श्री.यु.एस.जाधव यांच्या वतीने शपथेवर सुरू</u>**

१२. हे म्हणणे खरे आहे की, सन-२०१६ नंतर सर्वे क्र.१९/अ मध्ये माझ्या नावाने कोणतेही क्षेत्र नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिल अंगद दवलू मुळे यांना सर्वे क्र.१९/अ मध्ये ५१ आर जमीन होती व त्या पैकी ३० आर जमीन आम्ही सन-२००३ साली अभिमन्यू मुळे यांना विक्री केली. हे म्हणणे खरे आहे की, दि.१४/०७/२०१६ रोजी माझ्या वडिलांनी आमच्या संमतीने उर्वरित २१ आर जमीन प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना खरेदीखताआधारे विक्री केली. साक्षीदार स्वत: सांगतात की, २१ आर जमीन वाटणीपत्राआधारे न देता येत असल्यामुळे त्यांनी या २१ आर क्षेत्राचे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना खरेदीखत करून दिले.

१३. दशरथ, दवलू, व्यंकू आणि सुग्राव यांना सर्वे क्र.१९ मध्ये समान क्षेत्र होते. साक्षीदार स्वत: सांगतात की, कागदोपत्री त्यांना समान क्षेत्र होते. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र.१९ मध्ये फक्त कागदोपत्री समान क्षेत्र आहे याबाबत या चौघांपैकी कोणीही आजपर्यंत उजर घेतलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्यक्षात या चौघांच्या ताब्यात कमी जास्त क्षेत्र होते हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा आमच्याकडे नाही. दशरथ यांच्या ताब्यात २ एकर १३ गुंठे क्षेत्र होते हे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा आमच्याकडे नाही.

**<u>न्यायालयाची वेळ संपल्यामुळे उलट तपास तहकूब</u>.**

<u>श्रवणोत्तर स्विकृत.</u>

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.04.17 17:42:41 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर

दिनांक १७/०४/२०२५.